राज्यातील जमीनींना अद्वितिय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्यात आल्याने नवीन भूमापन क्रमांक/ हिस्सा क्रमांक देण्याची कार्यपध्दती

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे**

नवीन प्रशासकिय इमारत,२ रा मजला,पुणे ४११००१

परिपत्रक क्र. भूमापन २/प्र क्र २३०/२०२३

दिनांक : --/१२/२०२३.

वाचा: १. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र. १७७/ल-१, दिनांक २८ जुलै २०२२

२. महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन--२०२२/प्र.क्र.९४/ ज-१अ, दिनांक ३० नोव्हेंबर २०२२

३. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदी

४. महाराष्ट्र जमिन महसूल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९

५. या कार्यालयाकडील क्र. राभू-४/ ULPIN/नामकरण दुरुस्ती/२०२३, दि. ०५/०८/२०२३ चा प्रस्ताव

---

केंद्र शासनाच्या भूमि संसाधन विभागाकडील डिजिटल इंडिया लॅन्ड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्राम (DILRMP) अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकृत करण्यात आलेले आहेत. त्यासाठी अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबत वाचा क्र.१ मधील महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/ प्र.क्र.१७७ /ल-१, दिनांक २८ जुलै २०२२ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशांनुसार, राज्यातील प्रत्येक भूभागास अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN ( Unique Land Parcel Identification Number ) देण्यास मान्यता देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये ग्रामीण व नागरी भागातील प्रत्येक भूभागास महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या कलम २०(२), ८५, ८७, १०६ सह १३५,१२२,२४७ व २५७ अन्वये क्षेत्र व हद्दीत होणा-या बदलाबाबत पारित होणारे आदेश, तसेच शेतजमिनीसाठीच्या महाराष्ट्र धारण जमीनीचे तुकडे पाडणेस प्रतिबंध करण्याबाबत व तिचे एकत्रिकरण करणेबाबतचा अधिनियम, १९४७ मधील कलम ३२(१) नुसार जेव्हा जेव्हा क्षेत्र व हद्दीत बदल करुन नवीन भूमापन क्रमांक देणेत येतील तेव्हा, तसेच कमी जास्त पत्रकाचा अंमल व भूभाग अथवा क्षेत्राच्या सामिलीकरणामुळे अथवा पोटहिस्स्यांमुळे क्षेत्र व हद्दीमध्ये बदल होत असल्यास, त्यास नवीन अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक ULPIN (Unique Land Parcel Identification Number) देण्याबाबत कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक अधिकार अभिलेखासाठी अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) देण्यात आले आहेत. सदरचे अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) देताना, ते प्रत्येक भूभागाचे क्षेत्र, हद्दी यास भूभागनिहाय सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर नुसार देण्यात आलेले आहेत. उपरोक्त वाचा क्र. ५ अन्वये जमिनींचे “अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक” ऐवजी भारत सरकारच्या सुचनांप्रमाणे “मिळकतींचा अद्वितीय ओळख क्रमांक (PUID)” अशा बदलास मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार यापुढे अक्षांश व रेखांश आधारीत मोजणी झालेल्या भूखंडास १४ आकडी अक्षर व अंकयुक्त “अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN)” असणार आहे. तर अधिकार अभिलेखास ११ अंकी मिळकतीचा अंव्दितीय ओळख क्रमांक (PUID) लागू असणार आहे. एखाद्या भूभागाच्या क्षेत्र, हद्द व नकाशामध्ये बदल होणार असेल तर मूळ नकाशा व त्याचा भूमापन क्रमांक व अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) व मिळकतीचा अंव्दितीय ओळख क्रमांक (PUID) हे रद्द म्हणून साठविले जाणार असल्याने नव्याने होणा-या त्याच भूभागाचे अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) दुबार होवू नये म्हणून भूमापन क्रमांकही नव्याने देणे आवश्यक आहे. एखाद्या जमिनीच्या अस्तित्वातील हिस्स्यांमध्ये आदेशाने अथवा सामिलीकरण, पोट हिस्सा, बिनशेती, भूसंपादन, कोर्ट वाटप इत्यादी प्रकारच्या मोजणीमुळे क्षेत्र व हद्दीत बदल होत असल्यास नकाशामध्ये व अधिकार अभिलेख ७/१२ सदरी नवीन भूमापन क्रमांक देण्याबाबत स्पष्टता आणणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ८७ नुसार भूमापन क्रमांक व उपविभाग यांचे एकत्रिकरण व उपविभागात विभागणी करणे बाबत तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ असे नियम करण्यात आले आहे. त्यानुसार भूमापन क्रमांक व उपविभाग यांचे एकत्रिकरण व उपविभागात विभागणी करताना नवीन भूखंडास क्रमांक देणे बाबत त्यामधील नियम ११ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

भूमापन क्रमांक व उपविभाग यांचे एकत्रिकरण —

(३) जेव्हा असे, एकत्रिकरण करण्यात येते तेव्हा, दोन किंवा अधिक भूखंडाची भूमि अभिलेखात एकच नोंद होईल व विभिन्न एकत्रिकरणाच्या क्रमांकाच्या मालिकेतील पहिला क्रमांक देण्यात येईल. एकत्रिकरण करण्यापूर्वी असलेली सीमा चिन्हे काढून टाकण्यात येतील आणि गावाच्या नकाशामध्ये त्यानुसार बदल करण्यात येईल.

तसेच भूमापन नियमपुस्तिका मधील प्रकरण क्र. ८ मध्ये नवीन पोटहिस्सा अर्ज किंवा न्यायालयाचा हुकुमनामा यावरुन वाटपामध्ये पोट हिस्स्यांचे क्रमांक डावीकडून उजवीकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे दयावेत अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सबब वरील सर्व बाबी विचारात घेता, अद्वितीय भूभाग ओळख क्रमांक (ULPIN) दुबार होवू नये म्हणून आदेश/ निर्णयाने अथवा सामिलीकरण, पोट हिस्सा, बिनशेती, भूसंपादन, कोर्टवाटप इत्यादी प्रकारच्या मोजणीमुळे क्षेत्र व

हद्दीत बदल होत असल्यास नकाशामध्ये व अधिकार अभिलेख ७/१२ सदरी नवीन भूमापन क्रमांक देण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. ग्रामीण व नागरी भागातील पोटहिस्सा मोजणीवेळी ज्या भूभागाचा सर्व्हे नंबर / गट नंबर / नगर भूमापन क्रमांक / अंतिम भूखंड क्रमांक / हिस्सा नंबरचा नकाशा एक आहे. परंतु त्याचे अधिकार अभिलेख ७/१२ ची पाने एकापेक्षा जास्त वेगवेगळी करण्यात आली आहेत; अशा प्रकरणांत

(१) वेगवेगळया झालेल्या अधिकार अभिलेख ७/१२ चे पानांप्रमाणे हिश्यांची संख्या व त्याचे क्षेत्रामध्ये बदल होत नसेल तर अधिकार अभिलेख ७/१२ वरील पोटहिश्याचा क्रमांक नकाशामध्येही कायम ठेवण्यात यावा.

(२) वेगवेगळया झालेल्या अधिकार अभिलेख ७/१२ चे पानांप्रमाणे हिश्यांची संख्या कायम असेल तथापि, त्याचे क्षेत्रामध्ये बदल होत असेल, तर अधिकार अभिलेख ७/१२ वरील नमूद पोटहिस्स्याचा क्रमांक नकाशामध्येही कायम ठेवून फक्त अधिकार अभिलेख ७/१२ वरील क्षेत्रामध्ये आकारफोड पत्रकानुसार येणा-या क्षेत्राप्रमाणे फेरफार नोंद घेवून बदल करावा.

(३) वेगवेगळया झालेल्या अधिकार अभिलेख ७/१२ चे पानांप्रमाणे हिश्यांची संख्या व त्याचे क्षेत्रामध्ये बदल होत असेल तर नवीन भूमापन क्रमांक म्हणजेच सर्व्हे नंबर / गट नंबर /हिस्सा नंबर (यापैकी जे नमूद असतील त्यास) देण्यात यावा. सदरचा क्रमांक देताना अधिकार अभिलेख ७/१२ वरील क्रमांक कायम न ठेवता पोटहिस्स्याचे क्रमांक व मोजणी पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वरील क्रमांक वगळून त्यापुढील येणारे क्रमांक डावीकडून उजवीकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे देण्यात यावेत.

उदा. मोजणीपूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वर २१/१, २१/२, २१/३, २१/४ असतील तर पोटहिस्सा अथवा कोणत्या प्रकाराने जमिनीची विभागणी होणा-या मोजणी नंतर २१/१ ते २१/४ हे क्रमांक देणेत येवू नये व पोट हिस्सा क्रमांक २१/५ पासून सुरु करून पुढील पोट हिस्सा क्रमांक देण्यात यावेत.

२. ग्रामीण व नागरी भागातील पोटहिस्सा मोजणीवेळी ज्या भूभागाचा सर्व्हे नंबर / गट नंबर/नगरभूमापन क्रमांक / अंतिम भूखंड क्रमांक / हिस्सा नंबरचे नव्याने पोटहिस्सा होत असल्यास उपरोक्त क्रमांक १(३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ व मिळकत पत्रिकेवरील क्रमांक वगळून त्यापुढील येणारे क्रमांक देण्यात यावेत.

उदा: गट नं./स.नं./न.भू.क्र./अंतिम भूखंड क्र.१० मध्ये पुढीलप्रमाणे परिस्थिती निर्माण झाल्यास:-

१. एका गट नं. /स.नं./न.भू.क्र./ अंतिम भूखंड क्रमांकामध्ये नव्याने सरळ हिस्से होणे - १०/१, १०/२, १०/३ याप्रमाणे क्रमांक देण्यात यावे.

२.एका गट नं. /स. नं./ न.भू.क्र./ अंतिम भूखंडाचे पोट हिस्स्यामध्ये पोट हिस्से होणे उदा १ मधील सर्व्हे नंबर १०/१ मध्ये पोट हिस्से झाल्यास १०/१/१, १०/१/२, १०/१/३ याप्रमाणे क्रमांक देण्यात यावे.

३. ग्रामीण व नागरी भागातील सामिलीकरण मोजणीवेळी ज्या भूभागाचा सर्व्हे नंबर / गट नंबर / नगरभूमापन क्रमांक / अंतिम भूखंड क्रमांकाचे सामिलीकरण होवून मोजणी वेळी नवीन भूमापन क्रमांक देणे आवश्यक असेल तेथे, त्या गावातील / पेठेतील शेवटच्या क्रमांकापुढील क्रमांक देण्यात यावा. तसेच यापूर्वीचे पोट हिश्याचे सामिलीकरण होत असल्यास पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ व मिळकत पत्रिकेवरील क्रमांक वगळून त्यापुढील येणारे क्रमांक देण्यात यावेत.

उदा. गट नं./ स.नं./ न.भू.क्र./ अंतिम भूखंड क्रमांक १० मध्ये १०/१/१, १०/१/२, १०/१/३, १०/२ व १०/३ असे हिस्से असतील व त्यापैकी १०/१/१ व १०/२ चे सामिलीकरण झाल्यास १०/२ आणि १०/१/१ रद्द म्हणून राहणार असल्याने नवीन नंबर १०/४ असा क्रमांक देण्यात यावा.

४. ग्रामीण व नागरी भागातील प्रत्येक भूभागास महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या कलम २०(२), ८५, ८७, (१०६ सह १३५), १२२, २४७, २५७ अन्वये पारित झालेल्या आदेश / निर्णयामुळे क्षेत्र व हद्दीत बदल होत असतात. अशा क्षेत्रास नवीन भूमापन क्रमांक देणे आवश्यक असेल तेथे, त्या गावातील / पेठेतील शेवटच्या क्रमांकापुढील क्रमांक देण्यात यावा. त्यामध्ये पोट हिस्सा होत असेल तर उपरोक्त नमूद क्रमांक १(३) व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वरील क्रमांक वगळून त्यापुढील येणारे क्रमांक देण्यात यावेत.

५. पोटहिस्सा, बिनशेती, सामिलीकरण, कोर्टवाटप, भूमिसंपादन संयुक्त मोजणी, जमीन प्रदान इत्यादी मोजणी प्रकरणांमध्ये मोजणी नकाशावर तसेच गुणाकार बुक इत्यादी मध्ये हिस्सा क्रमांक / नवीन भूमापन क्रमांक नमूद करताना, तात्पुरता (provisional) क्रमांक नमूद करावा. त्यानंतर कमी जास्त पत्रक (क.जा.प.) अथवा आकारफोड पत्रक करताना, नवीन भूमापन / नगर भूमापन हिस्सा क्रमांक कायम देण्यात यावेत.

६. शेत जमिनीसाठीच्या महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडणेस प्रतिबंध करण्याबाबत व तिचे एकत्रिकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ मधील कलम ३२(१) नुसार दुरुस्ती करण्यात येते अशा प्रकरणात :

(६.१) जेव्हा क्षेत्र व हद्दीत बदल करुन नवीन भूमापन क्रमांक देणे आवश्यक असेल तेथे त्या गावातील / पेठेतील शेवटच्या भूमापन क्रमांकापुढील नवीन भूमापन क्रमांक देण्यात यावा. त्यामध्ये जर पोट हिस्सा होत असेल तर उपरोक्त नमूद क्रमांक १(३) व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वरील भूमापन क्रमांक वगळून त्यापुढील येणारे नविन भूमापन क्रमांक देण्यात यावेत.

(६.२) जेव्हा लेखनप्रमादामुळे नकाशाचे हद्दी अथवा क्षेत्र यामध्ये मूळ प्रमाणे दुरुस्ती करताना क्षेत्र व हद्दीत बदल होत असलेस व त्यास नवीन भूमापन क्रमांक देणे आवश्यक असेल तेथे त्या गावातील / पेठेतील शेवटच्या क्रमांकापुढील नविन भूमापन क्रमांक देण्यात यावा. जर पोट हिस्सा होत असेल तर

I/212525/2023

उपरोक्त नमूद क्रमांक १(३) व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वरील भूमापन क्रमांक वगळून त्यापुढील येणारे क्रमांक देण्यात यावेत.

७. कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त नमूद १(१) मध्ये दिलेल्या सुचना व्यतिरिक्त क्षेत्र व हद्दीत झालेल्या बदलामुळे नवीन भूमापन क्रमांक देणे आवश्यक असेल तेथे पूर्वीचे अधिकार अभिलेख ७/१२ वरील व पूर्वीचे मिळकत पत्रिकेवरील क्रमांक कायम ठेवण्यात येवू नये.

८. नवीन भूमापन क्रमांक / नगर भूमापन क्रमांक देण्यापूर्वी सदरचा नंबर उपलब्ध असल्याबाबत शेतजमिनीचे ७/१२ साठी ई फेरफार आज्ञावलीमध्ये व नागरी भागासाठी ईपीसीआएस आज्ञावलीमधून पडताळणी करावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

Signed by
Niranjan Kumar Sudhansu
Date: 22-12-2023 09:02:05

( एन के सुधांशु )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत : १.मा. अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.सर्व विभागीय आयुक्त यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३.सर्व जिल्हाधिकारी यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४.सर्व उपसंचालक भूमि अभिलेख योग्य त्या कार्यवाहीसाठी.
५.प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६.सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७.सर्व उपअधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
८.सर्व कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
९.परिपत्रक धारीका.